# कार्यालय नागपूर ,महानगरपालिका नागपूर .
## शिक्षण विभाग

शिक्षण विभाग (माध्यमिक)
म.न.पा.केंद्रीय कार्यालय
सिव्हील लाईन्स,नागपूर -०१.
जा.क्र. 326 दि.२०.८.२०१४

दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६९९३३, २५६७०२८
E-mail Id- education.nmc@gmail.com


प्रति,

मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./ उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

विषय:- दि. ८ सप्टेंबर २०१४ आंतरराष्ट्रिय साक्षरता दिन साजरा करण्याबाबत.
संदर्भ:- शिक्षणाधिकारी(निरंतर शिक्षण) यांचे कार्यालयीन पत्र क्र.शिअनिशि/आसांदि/८५४/दि. १३.८.२०१४.

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रिय साक्षरता दिन म्हणून जागतिक स्तरावर साजरा करण्यात येतो. या वर्षी ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रिय साक्षरता दिन प्रौढ व निरंतर शिक्षण कार्यक्रमास अनुसरून आपले स्तरावर दरवर्षीप्रमाणे साजरा करावयाचा आहे.या दिनाचे औचित्य साधून प्रौढ शिक्षण विशेषता महिला पैाढ शिक्षण लक्षात घेवून व निरंतर शिक्षणाचा प्रचार व प्रसार परिणामकारकरित्या होण्याच्या दृष्टीने खालील प्रकारचे उपक्रम आपले स्तरावरून आयोजित करून जनजागृती करण्यात यावी.

१. प्रौढ शिक्षण विषयक जनजागृती होण्याच्या दृष्टीने शालेय स्तरावरुन भित्तीचित्र स्पर्धा, घोषणावाक्य स्पर्धा व निबंधलेखन स्पर्धा घेण्यात याव्यात.
२. शालेय स्तरावरुन इयत्ता ७ वी ते ११ वी या विद्यार्थ्यांचा सहभाग घेवून तसेच एन.सी.सी. , स्काऊट गाईड च्या माध्यमातून प्रभातफेरी चे व प्रसारफेरीचे आयोजन करावे.
३. साक्षरतेसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, संघटना, प्रौढ शिक्षण विषयक कार्य करणाऱ्या व्यक्ती, शिक्षक, पत्रकार यांच्या सहकार्याने व्याख्यान व गटचर्चा या माध्यमातून स्थानिक लोकांपर्यंत साक्षरतेचे महत्व पटवून देण्यात यावे.
४. स्थानिक पातळीवर महिला बचत गटाच्या संस्थामार्फत निरक्षर व नवसाक्षर महिलांना साक्षरताविषयक माहिती देवून जागृती निर्माण करावी.
५. साक्षरतेच्या प्रसार व प्रसाराबरोबरच वृक्षसंवर्धन ,पाणी , उर्जा समस्या व उपाययोजना ,महिला आरोग्य , बालसंगोपन , घरच्या जमाखर्चाचे महत्व, शेतीचे व्यावसायीकरण उपलब्ध बाजारपेठ , शेतीमालाचा टिकाऊपणा व आकर्षकता वाढविणे यासाठी विविध मेळावे, कार्यशाळा , स्पर्धा इत्यादींचे आयोजन करण्यात यावे.
६. विकासाच्या कार्यक्रमात निरक्षर नवसाक्षर व्यक्तिचा विशेषत: महिलांना सहभागी करून विविध कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रवत्त करणे, राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे, पर्यावरणाचे रक्षण,स्त्री-पुरुष समानता, छोटया कुटूंबाचा आदर्श, लोकसंख्या शिक्षण इत्यादी बाबी जनमानसात रूजविण्यासाठी सदर दिनाचे निमित्ताने प्रसार व प्रचार करावा.

आपण सदर कार्यक्रम लोकांच्या सहभागातून व लोकवर्गणीतून संपन्न करावयाचा आहे. आपण स्थानिक नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींना या कार्यक्रमास निमंत्रीत करावे. व तसा कार्योत्तर अहवाल कार्यालयास सादर करावा.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर